ISSN 2278-8808
UGC APPROVED SR. NO. 45269
SJIF 2016 = 6.177
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# उत्कृष्ट भूगोल शिक्षकांसाठी आवश्यक अध्यापन पद्धती-क्षेत्रभेट व प्रादेशिक पद्धती.

**प्रा. गोर्डे भरत जयराम**

*जयवंतराव सावंत कॉलेज ऑफ एज्युकेशन, हांडेवाडी रोड, हडपसर, पुणे २८.*

Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com

## प्रस्तावना :-

उत्कृष्ट शिक्षक घडविण्यसाठी शिक्षकांना विविध अध्यापन पद्धतींची माहिती असणे आवश्यक आहे. प्रत्येक विषयात अध्यापन पद्धती वेगवेगळया आहेत. उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी अध्यापन पद्धतींचा वापर करावा लागतो. तसेच विद्यार्थ्यांना वर्गात खिळवून ठेवण्यासाठी शिक्षकाचे अध्यापन हे प्रभावी असलेच पाहिजे. परिणामकारक अध्यापनासाठी शिक्षकानी काही गोष्टींचा विचार केला पाहिजे.

**अध्यापन पद्धतींचे महत्त्व/गरज/आवश्यकता :-**

१. शिक्षकाला अध्यापनाची दिशा मिळते

२. ठराविक कालावधीत उद्दिष्टे साध्य होतात.

३. अध्ययन अध्यापनात वेगळेपणा अनुभवता येतो. त्यामुळे अभिरूची वाढते.

४. विषय-आशय-विद्यार्थी यांची सांगड घालण्यास अध्यापन पद्धती प्रभावी माध्यम आहे.

५. प्रत्येक अध्यापन पद्धतीचे स्वरूप भिन्न असल्यामुळे आशयाला योग्य अध्यापन पद्धतीची निवड करता येते.

६. उद्दिष्टांनुसार व विद्यार्थी वयोगट, क्षमतेनुसार अध्यापन पद्धती निवडून उद्दिष्टे सहज साध्य होतात.

**अध्यापन पद्धती निवडताना घ्यावयाची दक्षता बाबी काळजी :-**

१. विद्यार्थ्यांमधील भिन्नता, अध्ययन क्षमता, गती, अभिरूची इ. चा विचार अध्यापन पद्धती निवडताना करावा.

२. विषयानुसार तसेच अध्यापनाच्या उद्दिष्टांचा विचार करावा.

३. प्रभावी अध्यापन होण्यासाठी घटकाला अनुरूप अशी अध्यापन पद्धती निवडावी.

४. विद्यार्थ्यांना कृतीशील ठेवण्यासाठी व अवधान टिकवून ठेवणारी अध्यापन पद्धतीची निवड करावी.

५. ठराविक वेळेत प्रभावी अध्ययनास मदत करणारी अध्यापन पद्धती निवडावी.

६. अध्यापनात नाविन्यता, रंजकता व ताजेपणा आणणारी अध्यापन पद्धती निवडावी.

७. घटक अध्यापनासाठी उपलब्ध असणाऱ्या वेळेचाही विचार करावा.

- **क्षेत्रभेटः-**

भूगोल हे निरीक्षणाद्वारे शिकण्याचे शास्त्र आहे. आपल्या परिसरातील प्राकृतिक आणि आर्थिक घटकांची मूळ अथवा प्राथमिक माहिती मिळविण्यासाठी क्षेत्र अभ्यास ही एक चांगली संधी चालून आलेली आहे. तसेच क्षेत्र भेटीतून मानव व पर्यावरण यांच्यातील परस्पर संबंध जाणून घेण्यास मदत असते.

आपणाला कोणत्याही क्षेत्र अभ्यासाला जाण्यापूर्वी त्याचे वर्णन नियोजन करणे आवश्यक असते.नियोजन करताना प्रथम क्षेत्रभेटीचे ठिकाण नक्की करावे. उदाहरणार्थ नदी, धरण, कारखाना, गाव/वस्ती इ. ठिकाणी नक्की झाल्यानंतर त्यानुसार क्षेत्र अभ्यासाची पूर्वतयारी करावी.

**क्षेत्राची निवडः-**

आपल्या राहण्याच्या ठिकाणानुसार क्षेत्र भेटीसाठी वेगवेगळ्या ठिकाणांची निवड करणे शक्य असते. आपणांस प्राकृतिक वैशिष्ट्ये समजुन घेण्यासाठी नदी, किनारा, कालवा अथवा धरण ही उत्कृष्ट उदाहरणे आहेत. शहरातील विद्यार्थ्यांसाठी जवळचे जंगल, गाव, किंवा कारखाना क्षेत्र भेटीसाठी योग्य असेल विद्यार्थ्यांना त्या ठिकाणी सहज पोहचता आले पाहिजे. निवडलेली ठिकाणे विद्यार्थ्यांना जाण्या-येण्यास सोईस्कर असावीत.

**क्षेत्रभेटीची पूर्वतयारीः-**

क्षेत्रेभेटीला जाण्यापूर्वी विद्यार्थ्यांना आपण त्या ठिकाणी कोणत्या उद्देशाने जात आहोत हे माहित असणे आवश्यक आहे. त्यानुसार नक्की केलेल्या ठिकाणी पोहचण्याचा मार्ग अथवा त्या प्रदेशाचा आराखडा तयार करावा. काही ठिकाणे पाहण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक असते. उदाहरणार्थ कारखाना अथवा धरण त्यानुसार कार्यवाही करावी. माहितीच्या नोंदी करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांकडे नोंदवही, नमुना प्रश्नावली, पेन, पेन्सिल, मोजपट्टी, टेप, होकायंत्र, विविध वस्तु व पदार्थ गोळा करण्यासाठी पिशवी, कॅमेरा, दुर्बिन इ. असणे आवश्यक आहे. क्षेत्र भेटीच्या उद्द्देशानुसार त्या प्रदेशातील लोकांची माहिती गोळा करण्याची गरज असल्यास प्रश्नावली तयार करण्यात यावी. मृदा, दगड इ. वस्तुंचे नमुने गोळा करण्यासाठी विद्यार्थ्यांसोबत पिशव्या असाव्यात.

**अहवाल लेखनः-**

निरीक्षणाबरोबर गोळा केलेल्या सर्व वस्तु बाबत माहितीचा समावेश अहवाल लेखन असावा. विद्यार्थ्यांनी अहवाल लेखनात आराखडे, नकाशे, चित्रे, छायाचित्रे इ. चा उपयोग करावा तसेच सांख्यिकीय माहिती दर्शविण्यासाठी आलेख काढावेत.

अहवाल लिहिताना प्रामुख्याने खालील मुद्दे विचारात घ्यावेत व त्याप्रमाणे लेखन करावे.

**१) प्रस्तावनाः–**

क्षेत्र भेटीच्या ठिकाणाचे ठळक नाव लिहावे. शक्यतो नकाशा अथवा आराखडा काढून त्यामध्ये ते ठिकाण दाखवावे. शाळेपासून त्या ठिकाणाचे अंतर काढून त्याचा उल्लेख करावा. क्षेत्र भेटीच्या ठिकाणापर्यंत कसा व कोणत्या वाहनाने प्रवास केला आणि प्रवास करताना मार्गात कशाचे निरीक्षण केले त्याची थोडक्यात माहिती लिहावी.

**२) स्थानः–**

क्षेत्र अभ्यासाचे स्थान ठळक संदर्भ देऊन स्पष्ट करावे. ठिकाण टेकडीवर अथवा पठारावर असेल तर त्याचा उल्लेख करावा. भेट दिलेले ठिकाण गाव असेल तर त्याचे प्रशासकीय स्थान संदर्भासह देण्यात यावे.

**३) प्राकृतिक विशेषः–**

क्षेत्र अभ्यासाच्या स्थानाचा प्राकृतिक विशेष (भूरचना–सखल, पठार, टेकडी) स्पष्ट करावा. नद्या, कालवे, विहिरी अथवा सरोवरे इ. जलाशयांच्या नोंदीचा उल्लेख असावा. क्षेत्रातील मातीचा प्रकार ओळखण्याचा प्रयत्न करून नोंद करावी.

**४) हवामानः–**

भेट दिलेल्या क्षेत्राचे अथवा ठिकाणाचे तापमान व पर्जन्यमान नोंद करण्यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांची मदत घेऊन अथवा त्या क्षेत्रात राहणाऱ्या लोकांकडून सर्वसाधारण माहिती घेऊन हवामानाचा अहवाल लेखनात उल्लेख करावा.

**५) भूमीउपयोगः–**

भेट दिलेल्या क्षेत्रातील जमिनीचा वापर कोणकोणत्या कारणांसाठी केला आहे. त्याची नोंद करून कृषी, वन अथवा खाणकाम इ. साठी किती वापर झाला आहे. त्याची तपासणी करावी.

**६) लोकसंख्याः–**

अभ्यास क्षेत्रातील लोकसंख्या, पुरूषांची व स्त्रियांची संख्या, वय, साक्षर, निरक्षर, व्यवसाय इत्यादींची माहिती प्रश्नावलीच्या सहाय्याने गोळा करणे शक्य असते. त्या प्रदेशातील उपलब्ध सुविधांची पाहणी करून लोकांच्या राहणीमानाचा शोध घेता येतो. लोकसंख्या विषयक माहितीच्या अहवालात उल्लेख करताना तक्ते किंवा आलेखाचा उपयोग करावा.

**७) निष्कर्षः–**

विद्यार्थी माहिती व निरीक्षणाच्या आधारे नैसर्गिक व सांस्कृतिक पर्यावरणातील परस्पर संबंधाबाबत लिहू शकतात. प्रदेशातील लोकांचे व्यवसाय तेथील संसाधनावर कसे अवलंबून आहेत. तसेच हवामनाचा कृषी आकृतीबंधावर होणारा परिणाम ते स्पष्ट करू शकतात. संपूर्ण अभ्यास भेटीचा अनुभव लिहिताना आपण काय शिकले याबाबत उल्लेख करण्यास विसरू नये.

**क्षेत्रभेटीचे महत्त्व :-**

१) विद्यार्थ्यांना प्राकृतिक व सांस्कृतिक घटकांमधील परस्पर संबंधाचे आकलन होते.

२) मानव परिस्थितीशी कसे मिळते-जुळते होतो हे विद्यार्थी शिकत असतात.

३) विद्यार्थी प्रदेशा-प्रदेशातील मानवी क्रियांशी तुलना करणे.

४) विद्यार्थ्यांमधील निरीक्षण कौशल्याचा विकास होतो.

५) विद्यार्थी भौगोलिक घटनांची कारणमीमांसा करण्यास शिकतात.

६) लोकांच्याबरोबर कसे वागावे, कसे बोलावे हे शिकत असतात.

७) ज्या प्रदेशाला ते भेट देतात त्या प्रदेशाबद्दल त्यांच्यात आपुलकीची भावना जोपासली जाते.

- **प्रादेशिक पद्धतीः-**

प्रादेशिक भूगोलात स्थान, विस्तार, सीमा, पाकृतिक रचना, हवामान, वनस्पती, प्राणी, खनिजे, शेती, लोकजीवन इ. अभ्यास केला जातो. एका प्रादेशिक विभागाचा सहसंबंध दुसऱ्या प्रादेशिक विभागाशी कसा आहे याचा अभ्यास या पद्धतीत केला जातो. एक प्रादेशिक विभाग दुसाऱ्या प्रादेशिक विभागावर अवलंबून असतो. कोणताच प्रादेशिक विभाग परिपूर्ण नसतो. प्रादेशिक पद्धतीचे दोन विभाग आहेत.

अ. नैसर्गिक विभागश : पद्धती

ब. राजकीय विभागश : पद्धती

**अ. नैसर्गिक विभागशः पद्धती :-**

हवामानानुसार पृथ्वीवर काही नैसर्गिक विभाग तयार झाले आहेत. उदा. गवताळ प्रदेश, टुंड्राप्रदेश. कोणत्याही नैसर्गिक प्रदेशाच्या अभ्यासाची सुरूवात स्थानापासून ते लोकजीवनापर्यंत होत असते. यासाठी प्रामुख्याने कारणांकडून परिणामांकडे या सूत्राचा वापर केला जातो. एखाद्या ठिकाणचे मानवी जीवन हे त्या ठिकाणच्या स्थानावर अवलंबून आहे. याच कारणामुळे उष्ण वाळवंटी प्रदेशातील मानवी जीवन व टुंड्रा प्रदेशातील मानवी जीवन यामध्ये फरक आढळतो. तसेच या प्रदेशाच्या सीमा काटेकोर नसतात. नैसर्गिक विभागशः पद्धतीद्वारे परिसर आणि मानवी जीवन यांच्यातील परस्परावलंबन स्पष्ट करता येते. एखादा विशिष्ट प्रदेश इतर प्रदेशाहून निसर्गतः नैसर्गिकदृष्टीने वेगळा आहे. या पद्धतीनुसार केलेल्या अभ्यासामुळे मानवी जीवनाप्रमाणे असलेला नैसर्गिक कार्यकारण संबंध शोधण्याची सवय विद्यार्थ्यांना लागेल.

इयत्ता ६ वी तील विविध नैसर्गिक प्रदेशांचा अभ्यास या पद्धतीने करता येऊ शकतो. परंतु सर्वच प्रदेशांचा अभ्यास एकाच पद्धतीने केल्यास विद्यार्थ्यांना काहीसे कंटाळवाणे वाटेल. त्यासाठी दोन किंवा अधिक नैसर्गिक प्रदेशांचा अभ्यासही विद्यार्थ्यांकडून करून घेता येईल.

**ब. राजकीय विभागशः पद्धती :-**

तालुक्यापासून ते खंडापर्यंतच्या प्रादेशिक प्रदेशाचे अध्यापन करताना या पद्धतीचा वापर करतात. भूगोल शिक्षक या पद्धतीचा जास्त वापर करतात. नैसर्गिक प्रदेशांच्या सीमा काटेकोर नसतात. त्या कोणत्याही राजकीय विभागात येतात. परंतु राजकीय विभागाच्या सीमारेषा काटेकोर असतात. एकाच राजकीय विभागात अनेक नैसर्गिक प्रदेशांचा समावेश असू शकतो. या पद्धतीने अभ्यास करताना प्रामुख्याने लोकजीवनापासून ते स्थांनापर्यंत म्हणजे परिणामाकडून कारणाकडे या सूत्राचा वापर केला जातो. परंतु भूगोलाच्या पाठ्यपुस्तकाचा वापर करता स्थान ते लोकजीवन यामध्ये पाठ्यपुस्तकाची क्रमबद्ध मांडणी केली आहे.

**प्रादेशिक पद्धतीची वैशिष्ट्ये :-**

१. प्रादेशिक विभाग पद्धतीत तार्किक क्रम असतो. उदा. स्थानापासून मानवापर्यंत किंवा मानवापासून स्थानापर्यंत.

२. विद्यार्थ्यांना स्वयंअध्यापनाची सवय लागते.

३. विविध नैसर्गिक प्रदेशांच्या तौलनिक अभ्यासासाठी दिशादर्शक

४. नैसर्गिक कार्यकारणभाव संबंध शोधण्याची सवय विद्यार्थ्याला लागते.

**प्रादेशिक पद्धतीचे फायदे :-**

१. ही पद्धती वैज्ञानिक व मानसशास्त्रीय आहे

२. या पद्धतीमुळे भूगोलाचे अध्यापन अध्ययन सोपे जाते.

३. विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनाची सवय लागते

४. अध्यापनासाठी वेळ कमी लागतो

५. प्रदेशातील कार्यकारण संबंध समजण्यास मदत होते

६. विद्यार्थ्यांमध्ये आंतराष्ट्रीय सामंजस्य व विश्वबंधुत्याची भावना निर्माण होते.

**प्रादेशिक पद्धतीच्या मर्यादा :-**

१. सर्व पाठ्यघटकाचे या पद्धतीने अध्यापन करता येत नाही.

२. प्रदेशानुसार नकाशे व इतर शैक्षणिक साधने उपलब्ध होतीलच असे नाही.

३. मुद्यांची पुनरावृत्ती असल्याने ही पद्धती कंटाळवाणी वाटते.

**प्रादेशिक पद्धतीचा उपयोग पुढीलप्रमाणे करावा :-**

१. विद्यार्थ्यांचा वयोगट व मानसिक क्षमता यांचा विचार करून पाठाचे नियोजन करावे.

२. स्थान, विस्तार व सीमा यासाठी नकाशाचा वापर योग्य पद्धतीने करावा. विद्यार्थी सहभाग घ्यावा.

३. प्राकृतिक विभागाचे अध्यापन करताना त्या प्रदेशाच्या प्राकृतिक नकाशाचा वापर करावा. पर्वत, पठारे, मैदाने, नद्या, सरोवरे या क्रमाने माहिती सांगावी.

४. वनस्पती व प्राणी यांची माहिती सांगताना फलकावर ती नावे लिहा. त्याची चित्रे, फोटो विद्यार्थ्यांना दाखवा. पाठ्यपुस्तकातील चित्रे दाखवू नका. इतर संदर्भ ग्रंथांचा, इंटरनेटचा वापर करावा.

५. हवामान या मुद्याचे अध्यापन करताना तापमान, पर्जन्य, वार्षिक हवामान इ. माहिती आकडेवारीवरून द्यावी. यामध्येदेखील नकाशाचा वापर करावा

६. मानवी जीवनाच्या अध्यपनासाठी पोषाख, घरे, अन्न, राहणीमान यांचे अध्यापन करताना चित्रे, प्रतिकृती इ. वापर भरपूर प्रमाणात करावा. प्रश्न विचारावेत

७. पाठाच्या संकलनामध्ये नकाशा भरणे, तक्ता पूर्ण करणे, पाठावर विविध प्रश्न, नकाशातील ठिकाणे ओळखणे इ. वापर करून मनोरंजकता वाढविता येते. ङ्ख

८. बुद्धीला चालना देणारा गृहपाठ व स्वाध्याय विद्यार्थ्यांना देणे.

९. या पद्धतीने पाठ घेताना प्रत्येक मुद्याचे स्पष्टीकरण देत असताना प्रमुख मुद्दे, महत्त्वाची माहिती, आकडेवारी रंगीत खडूने फलकावर लिहावी.

**संदर्भग्रंथ :-**

*पाटील उषा व जोशी सुरेखा - आशययुक्त अध्यापन पद्धती तंत्र भूगोल, प्रकाशक- सचिन जोशी, नागपूर रोड, नाशिक.*

*पोंक्षे द. बा.- भूगोल अध्यापन, (१९९७), नूतन प्रकाशन, पुणे.*

*बापट भा. गो.- भूगोल अध्ययन आणि अध्यापन, (१९९४), व्हिनस प्रकाशन, पुणे.*

*शिंदे डी. बी. व पाटील बी. एम.- भूगोल आशययुक्त अध्यापन पद्धती, (२००७), फडके प्रकाशन, कोल्हापूर.*

*जाधव के. के.- भूगोल शिक्षण आशययुक्त अध्यापन पद्धती, (२००८), मन प्रकाशन, नाशिक.*